जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५१५ दिनांक - ०९/०७/२०२३**

## पीसीबी,गुन्हे शाखा,पुणे शहर अंतर्गत एमपीडीए कारवाई

## चतु:श्रुंगी पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये २९ वी स्थानबध्दतेची कारवाई

पुणे पोलीस आयुक्तालयातील चतु:श्रुंगी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **शुभम उर्फ ताया सुनिल दुबळे,वय २१ वर्ष,रा.फ्लॅट नं.४०३,चिंतामणी सोसायटी,मानाजी नगर,गणपती माथ्या जवळ,न-हे,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे.त्याने त्याच्या साथीदारांसह चतु:श्रुंगी पोलीस स्टेशनच्या हद्दीत लोखंडी हत्यार,तलवार,लोखंडी रॉड,लाकडी दांडके,लाकडी बॅट या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह **खुनाचा प्रयत्न,जबरी चोरी,घातक शस्त्राने दुखापत करणे, दंगा, बेकायदा हत्यार बाळगणे** यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत.मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०५ गुन्हे दाखल आहेत.त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती.तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार,यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये अमरावती मध्यवर्ती कारागृह,अमरावती येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री. बालाजी पांढरे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,चतु:श्रुंगी पोलीस स्टेशन पुणे व श्री.चंद्रकांत बेदरे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी कामगिरी पार पाडली.

मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही २९ वी कारवाई असून,** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.